# 'युवा महोत्सव २०२२' 'हम भी कुछ कम नहीं' चा प्रत्यय

## दुसऱ्या दिवशी विविध कलाविष्कार सादर करून तरुणाईने रसिकांना मंत्रमुग्ध केले

**अमरावती -** अगदी व्यावसायिक कलावंतांनी सादर करावे असे शास्त्रीय नृत्य, विविध भारतीय लोकसंस्कृतीची ओळख करून देणारे लोकनृत्य, भारतीय समूहगान, मन रीझविणारे सुगम संगीत, सामाजिक परिस्थितीवर भाष्य करणाऱ्या एकांकिका आणि स्कीट व माईम, अगदी वेळेवर मिळालेल्या विषयावर अभ्यासपूर्ण विवेचन करणारी वक्तृत्व कला, कोणती बाजू बरोबर आहे? हा प्रश्न उपस्थित करणारा आणि श्रोत्यांना संभ्रमात टाकणारा वादविवाद यांच्या सादरीकरणाने आज पश्चिम विदर्भातील विद्यार्थ्यांनी 'हम भी कुछ कम नहीं' चा प्रत्यय अमरावतीकरांना दिला. तर फोक ऑर्केस्ट्रा आणि स्पॉट पेंटिंगने 'युवा महोत्सव २०२२' मध्ये विविध रंगांची उधळण केली.

श्री शिवाजी कला व वाणिज्य महाविद्यालयाने आयोजित केलेल्या संत गाडगेबाबा अमरावती विद्यापीठाच्या 'युवा महोत्सव २०२२' आज दुसऱ्या दिवशी विविध जिल्ह्यातील महाविद्यालयीन विद्यार्थ्यांनी अनेक कलाप्रकारामध्ये आपले सादरीकरण करून रसिक प्रेक्षकांना मंत्रमुग्ध केले आणि कौतुकाची थाप मिळविली. तरुणाईच्या जोशाला मिळणारा प्रतिसाद स्पर्धक विद्यार्थ्यांचे मनोबल वाढविणारा ठरला.

या युवा महोत्सवात आज दुसऱ्या दिवशी लोकनृत्य, शास्त्रीय नृत्य, शास्त्रीय गायन, भारतीय समूहगान, सुगम संगीत, एकांकिका, स्कीट व माईम, वादविवाद स्पर्धा, वक्तृत्व स्पर्धा, मिमिक्री, कोलाज, स्पॉट पेंटिंग, पोस्टर मेकिंग, फोक ऑर्केस्ट्रा आदी कलाप्रकारांचे छत्रपती शिवाजी महाराज सभागृह, डॉ.पंजाबराव देशमुख वैद्यकीय महाविद्यालय, डॉ.पंजाबराव देशमुख विधी महाविद्यालय सभागृह, मा.जिजाऊ मुख्य सभागृह व ए.व्ही. थियेटर, श्री शिवाजी विज्ञान महाविद्यालय, सी.व्ही.रमण सभागृह, राज्यशास्त्र विभाग सभागृह, आर्ट गॅलरी व पंजाबराव देशमुख सेमिनार हॉल, श्री शिवाजी कला व वाणिज्य महाविद्यालय, श्रीमती विमलाबाई देशमुख सभागृह, नर्सिंग कॉलेज आदी ठिकाणी सादरीकरण केले.

छत्रपती शिवाजी महाराज सभागृहात झालेल्या लोकनृत्य आणि शास्त्रीय नृत्य स्पर्धेत विविध महाविद्यालयाच्या विद्यार्थ्यांनी आपली कला सादर करून कलाविष्काराचे उत्तम दर्शन घडविले. ए.व्ही. थियेटरमध्ये झालेल्या वादविवाद स्पर्धेत स्पर्धकांनी विषयाचे दोन्ही बाजूने खंडन मंडन करून अभ्यासपूर्ण मांडणी केली. आजचे सर्वच सादरीकरण हे आपले विद्यार्थी विविध कला प्रकारात कुठेही मागे नाहीत हे दाखवून देणारे आणि भविष्यात कलावंत म्हणून आपले व आपल्या महाविद्यालय आणि विद्यापीठाचे नाव रोषण करतील, असेच होते.

**प्राचार्य डॉ.रामेश्वर भिसे**

'युवा महोत्सव २०२२' ला अमरावतीकरांकडून मळित असलेल्या प्रतसािदाबद्धल श्री शविाजी कला व वाणज्यि महावद्यिालयाचे प्राचार्य आणि मुख्य संयोजक डॉ.रामेश्वर भसिे यांनी आभार मानले आहेत.

अत्यंत शस्तिबद्ध व शांततेत वद्यिार्थी या महोत्सवाचा आनंद घेत असून प्रत्येक सभागृहात रसकिांची असलेली उपस्थिती ही लक्षणीय आहे. अजून दोन दविस हा महोत्सव सुरु राहणार आहे, त्यामुळे अमरावतीकर रसकिांनी या महोत्सवाला सहपरविार उपस्थति राहावे आणि स्पर्धेत सहभागी वद्यिार्थ्यांचे मनोबल वाढवावे तसेच नव्या पढिीला त्यांच्यातील कलागुण वकिसति करण्यासाठी प्रोत्साहीत करावे, असे आवाहन ही प्राचार्य डॉ.भसिे यांनी केले आहे.

**डॉ.राजीव बोरकर**

संत गाडगेबाबा अमरावती वद्यिापीठाच्या वद्यिार्थी वकिास वभिागाचे संचालक डॉ.राजीव बोरकर यांनी 'युवा महोत्सव २०२२' च्या शस्तिबद्ध आयोजनाबद्धल श्री शविाजी कला व वाणज्यि महावद्यिालयाचे कौतुक व अभनिंदन केले आहे. कुलगुरू डॉ.दलिीप मालखेडे यांचे मार्गदर्शन आणि ऊर्जा अमरावती वद्यिापीठाअंतर्गतच्या महावद्यिालयांना प्रोत्साहन देणारी असून त्यामुळे या महोत्सवाला वद्यिार्थ्यांनी प्रचंड प्रतसािद दलि्याबद्धल त्यांनी महावद्यिालयांचे आभार मानले.